# श्री. महादेव गोविंदराव लोखंडे

सेवक क्र. ६७७ से.नं. ६९९ रघुजीनगर, नागपूर

माझे वडील स्वतः जादू-टोणा मंत्र-तंत्र शिकलेले होते. तसेच त्यांच्या अंगातसुध्दा येत होते. माझ्या वडिलांना पोट दुखण्याचा त्रास सुरु झाला. एकदा पोट दुखू लागले की ते बैचेन होत असत व मोठ्याने ओरडत असत. त्यांचे ओरडणे चारपाच घरी ऐकू जात असे. दुखणे नाहीसे व्हावे म्हणून अनेक प्रकारचे उपाय करुन सुध्दा त्यांना समाधान मिळत नव्हते. नंतर त्यांनी डॉक्टरांचे उपाय केले. तरीपण आराम मिळाला नाही. शेवटी त्यांनी दुसऱ्या जाणत्याकडून तसेव ज्यांच्या अंगात सवारी येत होती अशा महान आणि हुशार लोकांकडून प्रयत्न केले तरीही त्यांना यश मिळाले नाही. ते जाणते लोक म्हणत होते की, या आजाराचे रहस्य तुमच्याच घरी म्हणजे तुमच्या पत्नीजवळ आहे. तिच्याजवळ जागृत विद्या आहे. तेव्ही मी म्हणालो, जर माझ्या पत्नीजवळ जागृत विद्या आहे. तर तुम्ही वडिलांचे दुःख माझ्या पत्नीवर उलटवून दाखवा किंवा तिला तुमच्या शक्तीने ठार मारुन दाखवा. ह्याकरिता मी वाटेल तेवढे भाव-ठाव देण्यास तयार आहे. पण ते तसे करु शकले नाही. तसेच त्यांनी सांगितले की, तुमच्या पत्नीजवळ चोवीस तास जागृत नापाक मोठे 'वीर' आहेत. तिच्या प्रत्येक पावलावर ते काम करतात म्हणून तिला मारणे सोपे नाही. वरील कारणास्तव घरात कल्पना शिरली की घराचा नाश होतो. हळूहळू माझी परिस्थिती दिवसेंदिवस खालावली. घरी खायला अन्न नाही, नेसायला बरोबर कपडे नाहीत, तसेच पांघरायला सुध्दा बरोबर नाही आणि वडिलांचे पोटाचे दुखणे मात्र दिवसेंदिवस वाढतच आहे अशी स्थिती माझी झाली. मनस्वास्थ्य नाहीसे झाले. मला वाटले की आपण स्वतः आत्महत्या करावी किंवा घर सोडून कुठेही निघून जावे. अनेक प्रकारचे उपाय केले. पण समाधान मिळत नव्हते. माझ्या एका मित्राकडून एकाच भगवंताच्या कृपेबद्दल माहिती मिळाली. नंतर आम्ही शांतिनगरला राहणारे श्री. रामकृष्णाजी बारापात्रे यांच्याकडे गेलो. त्यांनी ह्या मार्गाबद्दल मार्गदर्शन केले. आम्ही घरी विचारविनिमय केला आणि अकरा दिवसांची त्यागाची अगरबत्ती घेतली. तीन दिवसांतच वडिलांचक पोटाचे दुःखं कमी झाले. तेव्हा मी निश्चय केला की ह्या परमेश्वराला मी जीवनात विसरणार नाही. त्यागाचे अकरा दिवस पूर्ण केल्यानंतर मी बेचाळीस दिवसांची अगरबत्ती घेतली. त्या अवधीत माझ्याकडून किंवा कुटुंबाकडून

काहीतरी चूक झाली. पण ते आमच्या लक्षात आले नाही. माझा तीन वर्षाचा मुलगा एकाएकी मरण पावलाक्ष मनात वाईट वाटले. तसेच दुःख सुध्दा झाले तरीपण मी माझे धैर्य सोडले नाही. बाबांच्या मार्गदर्शनाने मुलगा परत येईल असा विश्वास वाटत होता आणि एकाच भगवंताच्या कृपेने मला दुसरा मुलगा परमेश्वराने दिला.

पुन्हा बेचाळीस दिवस घेतले. काही दिवस गेल्यावर वडील म्हणाले, माझ्याजवळ जादू-मंतराची पुस्तके आहेत. ती मी कन्हानला जाऊन शिरवून चार तासांच्या आत येतो. पण ते तीन दिवस परत आले नाहीत. त्यांच्या मनात काय होते ते मी ओळखले नाही. वरील घटना बाबांकडे जाऊन सांगितल्यावर बाबांनी आम्हाला आमचे कार्य सुरुच ठेवा म्हणून सांगितले आणि वडील आल्यावर त्यांना अलग राहा म्हणून सांगायचे ठरविले. वडिलांचे विचार निराळेच होते. त्यामुळे त्यांचे दुःख नाहीसे झाले नाही. आमचे बेचाळीस दिवस संपले. हवनकार्य झाले. आम्हाला संपुर्ण सुख समाधान मिळाले. परंतु वडिलांना काहीच समाधान मिळाले नाही. आणि शेवटी ते मरण पावले. आणि ते गेल्यावर आम्ही सर्व मंडळी सुख समाधानाने आपले जीवन व्यतीत करीत आहोत. परमेश्वरी कृपेने मला तीन मुले व एक मुलगी आहे. मी जीवनात बाबांच्या आदेशांचे पालन करीन असे सत्य वचन देतो.

* * * * *